**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांना राजीनामा पुर्वसुचना कालावधीमधील तरतुदीमध्ये सुधारीत नियम लागू करणे.**

**उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**

५ वा मजला, दक्षिण बाजू सिडको भवन सीबीडी,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
एमएसआरएलएम/प्र.क्र. ३६/२०१८, दिनांक - ०३/ ०५ /२०१८
कार्यालयीन परिपत्रक क्र. २३७

**संदर्भ** - १) मनुष्यबळ संसाधन मार्गदर्शक पुस्तिका मुद्द क्र. ६.४.१
२) राज्यस्तरीय कार्यकारी समिती सभा दिनांक २६/३/२०१८

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत मान्य मनुष्यबळ संसाधन पुस्तिकेतील मुद्द क्र. ६.४.१ मध्ये नमुद तरतुदीनुसार कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांनी राजीनामा देण्यापूर्वी एक महिना कालावधीची पूर्वसूचना द्यावी अथवा एक महिन्याचे वेतन त्यांनी अभियानाकडे जमा करावे, अशी तरतुद आहे. अभियानामध्ये अचानक एखाद्या अधिकारी व कर्मचा-याने राजीनामा दिल्यानंतर ते एक महिन्याचे वेतन भरून त्यांना कार्यमुक्त करणेची विनंती करतात. त्यामुळे अभियानाच्या कामावर परिणाम होतो. तरी सदर तरतुदीमध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करणेत येत आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील (सहाय्यक, स्वीय सहाय्यक, लघुलेखक, लिपिक, रोखपाल, लेखापाल, प्रशासन सहाय्यक, प्रशासन व लेखा सहाय्यक, डेटा एन्ट्री ऑपरेटर व शिपाई पदांवरील कर्मचारी) यांना राजीनामा द्यावयाचा असल्यास, त्यांनी दोन महिन्याची पुर्वसूचना अथवा एका महिन्याचे वेतन अभियानाकडे जमा करावे. तसेच वरील कंत्राटी सहाय्यक कर्मचारी वगळता अभियानातील उर्वरित कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांना राजीनामा द्यावयाचा असल्यास, त्यांनी तीन महिन्याची पुर्वसुचना अथवा दोन महिन्याचे वेतन अभियानाकडे जमा करावे, अशी सुधारणा करण्यात आलेली आहे.

सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सदर नियम दिनांक २६.३.२०१८ पासून लागू राहील. परंतू दिनांक २६.३.२०१८ पासून सदर परिपत्रक निर्गमित केलेल्या दिनांकापर्यंत ज्या अधिकारी / कर्मचारी यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे, त्यांना सदर तरतुदीतून सुट देण्यात येत आहे. व ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी पुर्वसुचना राजीनामे अर्ज सादर केले आहे त्यांना सदरील नियम लागू राहील, याची नोंद घ्यावी.

3/5/2018

**आर.विमला, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**

प्रत :-

१. मा. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. उपसचिव (योजना) ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांना माहितीस्तव
३. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा अभियान संचालक, जिल्हा परिषद, सर्व यांना माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
४. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव
५. प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व यांना माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
६. जिल्हा अभियान व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, (सर्व इन्टेसिव्ह जिल्हे) -------------- यांना माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
७. ------------------------------------------, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर, नवी मुंबई यांना माहितीस्तव
८. लेखा शाखा, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर, नवी मुंबई
९. प्रशासन शाखा, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर, नवी मुंबई